# कार्यालय नागपूर महानगरपालिका, नागपूर
## ( शिक्षण विभाग )

क्र.1276/शि.वि. दि.20/11/2013.

प्रति,

मुख्याध्यापक / मुख्याध्यापिका,
सर्व प्राथ. / उच्च प्राथ. / माध्यमिक शाळा,
म.न.पा. नागपूर.

**विषय :— 26 नोव्हेबंर 2013 रोजी 'संविधान दिन' असल्यामुळे शालेय स्तरावर विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्याबाबत.**

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, दि. 26 /11/2013 रोजी संविधान दिन आहे. या निमीत्ताने आपल्या शाळेत संविधान उद्देशिकेचे सामूहीक वाचन परीपाठाच्या वेळेस करण्यात यावे. तसेच सविधान उद्देशिकेचे मोठे फोटोफ्रेम खरेदी करून आपल्या शाळेत दर्शनीभागात लावावे. संविधान दिनानिमीत्त शाळेत चित्रकला स्पर्धा, निंबध स्पर्धा वकृत्व स्पर्धा यांचे आयोजन करून शाळा शिक्षण सूधार समितीतर्फे विजेत्यांना पारितोषिक देवून प्रोत्साहीत करावे. तसेच सकाळी प्रभातफेरीचे आयोजन करून मा. नगरसेवक, पालक, शाळा सूधार समिती सदस्य तसेच सन्माननीय नागरिक यांना सहभागी करावे व अहवाल कार्यालयास शाळा निरीक्षक मार्फत सादर करावा.

शिक्षणाधिकारी,
नागपूर महानगरपालिका, नागपूर

**प्रतिलिपी :—**

1) मा. उपायुक्त, म.न.पा. नागपूर

PC:2/D:\Tembhurne sir \ Letter 1.doc

# भारताचे संविधान

## उद्देशिका

**आम्ही,** भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम
समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य घडवण्याचा
व त्याच्या सर्व नागरिकांस :
सामाजिक, आर्थिक व राजनैतिक न्याय ;
विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा
व उपासना यांचे स्वातंत्र्य ;
दर्जाची व संधीची समानता ;
निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा
आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा
व राष्ट्राची एकता आणि एकात्मता
यांचे आश्वासन देणारी बंधुता
प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून ;
आमच्या संविधानसभेत
आज दिनांक सव्वीस नोव्हेंबर, १९४९ रोजी
याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित
करून स्वत:प्रत अर्पण करत आहोत.